भारतीय जनता पार्टी - शिवसेना युती

१, जलाराम नगर, वल्लभबाग लेन, गांधी मार्केट समोर, घाटकोपर (पूर्व),
मुंबई - ४०० ०७४ टेलिफोन : २५१४ ९९७८, २५१४ ७८८९


कृपया प्रसिद्धीसाठी

दि.२१.एप्रिल २००९

## ईशान्य मुंबईत किरीट सोमैया यांची विजयाकडे आगेकुच

“ईशान्य मुंबईत भाजपा-शिवसेना युतीच्या बाजुने हवा वाहत असून या हवेत किरीट सोमैया नावाच्या झंझावता समोर लढायला घाबरुन काँग्रेयचे विघमान खासदार यांनी पळ काढला “, असे उद्गार आमदार श्री प्रकाश महेता यांनी घाटकोपर येथे काढले.

श्री किरीट सोमैया यांच्या निवडणुक प्रचार फेरीत ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की ईशान्य मुंबईत भाजपा-शिवसेना युतीच्या प्रचाराने वेग घेतला असून या फेरीत मतदारांशी पत्रांद्वारे संवाद, बूथ स्तरापर्यंत कार्यकर्त्यांमध्ये कामाचे वाटप, ५/६ बूथांच्या समुहाचा एक शक्ति केंद्र व त्याल जबाबदार असा एक शक्ति केंद्र प्रमुख व त्यांच्या मदतीने राबवलेले ‘घर चलो अभियान‘, असे विभिन्न उपक्रम राबवण्यात आले आहेत.

किरीट सोमैयांना ईशान्य मुंबईतील नागरिक उत्स्फुर्त प्रतिसाद देत असून त्यांचा जनसुरक्षा रथ जेथे जातो तेथे हजारोंच्या संख्येनी त्यांचे स्वागत होते.

जनतेशी संपर्क साधण्याची सोमैया यांची एक आगळी पदधत आहे. त्यांच्या प्रचाराचा भर रथयात्रे व्यतिरिक्त ग्रुप मिटिंगस, सोसायटी मिटिंगस, वस्त्यांमध्ये पदयात्रा -अशा पदधतीने मतदारांशी ते संपर्क साधतात.

श्री.जोगेंद्र कवाडे यांच्या पिपल्स रिपब्लिकन पार्टीने सोमैया यांना पाठिंबा दिला आहे. यानिमित्ताने शिवशक्ती व भिमशक्ती एकत्र येऊन श्री.किरीट सोमैया यांच्या विजयासाठी काम करत आहेत.

श्री.सोमैया यांनी निवडून आल्यानंतर आतंकवादाच्या बळींना राहत व पुनर्वसन, वन जमिनींवरील रहिवाश्यांना न्याय, ईशान्य मुंबईतील लोडशेडिंग बंद करणे, कुर्ला ते ठाणे रेल मार्गाचे एका वर्षात सहा पदरीकरण व घरोघरी पाईप गॅस पोचवणे या विषयांवर आपण कारवाई करु असे सांगितले.


दयानंद नेने

**9004028575**




ईशान्य मुंबई उमेदवार : श्री किरीट सौमेया